11 AUG 2026
सकाळ

# साहित्यिकांनी निर्भय होऊन लिहावे : कुलगुरू डॉ. कामत

कोल्हापूर, ता. १० : सत्ता आणि सुधारणा हे राजर्षी शाहू महाराज यांनी कार्यातून दाखवून दिले. प्रा. किसनराव कुराडे हे समाजाला दिशा दाखविणारे दीपस्तंभ आहेत. सत्याचा आणि नैतिकतेचा आवाज बनण्यासाठी साहित्यिकांनी निर्भय होऊन लिहिणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसनराव कुराडे यांचा सत्कार व निवडक साहित्यावर आधारित 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य' ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. निर्मिती प्रकाशन प्रकाशित डॉ. कपिल राजहंस आणि डॉ. शोभा चाळके-म्हमाणे यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. डॉ. श्रीमंत कोकाटे, दंगलकार नितीन चंदनशिवे यांनी मनोगत व्यक्त केले. क्रांतिदेवी कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, डॉ. आलोक जत्राटकर, शिवाजीराव परुळेकर, प्रा. बिनादेवी कुराडे, दिग्विजय कुराडे, बसवराज आजरी, कमल कुरळे, प्रा. आनंद नाळे आदी उपस्थित होते. सुरेश केसरकर यांनी स्वागत केले. अनिल म्हमाणे यांनी प्रास्ताविक केले. अभिजित मासुर्लीकर यांनी सूत्रसंचालन केले. अंतिमा कोल्हापूरकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'प्रबोधक प्रा. किसनराव कुराडे निवडक साहित्य' या ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. श्रीमंत कोकाटे. शेजारी डॉ. आलोक जत्राटकर, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, कुलगुरू डॉ. राजनीश कामत, दंगलकार नितीन चंदनशिवे, अंतिमा कोल्हापूरकर आदी.

1 1 AUG 2026
पुढारी



कोल्हापूर : मास कम्युनिकेशनची माजी विद्यार्थिनी साई सिमरन घाशीला शुभेच्छा देताना प्रा. डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आदी. (छाया : मिलन मकानदार)

# मास मीडियातून जनहिताला प्राधान्य द्या : डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजात मास मीडियाची भूमिका महत्त्वाची असून, विविध माध्यमांत नवनियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांनी सामाजिक हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन प्र- कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने नुकत्याच विविध माध्यमांतून जॉईन झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या. बीबीसी न्यूज मराठीला निवड झाल्याबद्दल साई सिमरन घाशी या विद्यार्थिनीचा डॉ. जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या तीन वर्षांत मास कम्युनिकेशन विभागाचे तीसहून अधिक विद्यार्थी स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीवरच्या माध्यमात जॉईन झाले आहेत. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

1 1 AUG 2026
पुढारी

# विद्यापीठात क्रांतिदिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक क्रांतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यसैनिकांना व हुतात्म्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ परिसरातील 'क्रांतीवन' येथे हा कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. रजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी क्रांतीवनातील स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. डॉ. भारती पाटील यांनी याचे संयोजन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. संजय चोपडे, सुरक्षा अधिकारी वसंत एकले, सुरेखा अडके यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

11 AUG 2026
पुढारी

संक्षिप्त

# भारत-चीन संबंधांवर उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व एक्स सर्व्हिसेस लीग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १२) दुपारी तीन वाजता मानव्यशास्त्र सभागृहात 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. बीजभाषक म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर मांडणी करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात व आजी-माजी लष्करी अधिकारी, मान्यवर व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार व कर्नल सी. जे. रानडे (सेवानिवृत्त) यांनी केले आहे.

11 AUG 2026
सकाळ

# 'प्रतिसरकारातील महिला'वर गुरुवारी राज्यस्तरीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (ता. १३) 'प्रतिसरकारची चळवळ : रणरागिणी रणि ठाकल्या' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र होत आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी साडेदहा वाजता त्यास सुरुवात होईल. ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर बीजभाषण करतील. दोन सत्रांत चर्चासत्र होणार असून, त्यात 'प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान स्त्रिया' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

11 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

# शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची सांख्यिकी अधिकारी पदावर निवड

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या सांख्यिकी अधिकारी/ संशोधन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) पदाच्या भरती प्रक्रियेत शिवाजी विद्यापीठाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातील सांख्यिकी अधिकारी (DSO)/संशोधन अधिकारी (RO) या पदासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पृथ्वीराज विठ्ठल झांबरे, आदिनाथ तुकाराम पाटील, रविंद्र एकनाथ देवरे, सोनम श्रीकांत पाटील, निकेत गणेश जाधव, स्वनिल सतीश माने, तेजश्री मनमोहन राजे आणि विद्या बाळासाहेब वालकोळी यांचा समावेश आहे. अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांच्यासह सर्व शिक्षकांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या भरती प्रक्रियेत राज्यभरातून निवड झालेल्या २५ उमेदवारांपैकी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, हे प्रमाण ३२ टक्के इतके आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या गुणवत्तापूर्ण अध्यापन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची प्रभावी परंपरा पुन्हा अधोरेखित झाली आहे.

'संख्याशास्त्र अधिविभागाची गुणवत्ता अधोरेखित'

संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आज केंद्र व राज्य शासनाच्या अनेक महत्त्वाच्या पदांवर येथील विद्यार्थी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रांतही विविध पदांवर विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. आज आठ विद्यार्थ्यांच्या यशामुळे अधिविभागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता नव्याने अधोरेखित झाली आहे. विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांसाठीही त्यांचे यश प्रेरणादायी आहे. या विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक अभिनंदनास पात्र आहेत, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केले आहेत.

11 AUG 2026
पुढारी

# विद्यापीठातील पत्रकारिता विभागासमोर वृक्षारोपण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रांतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागासमोर मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी फळझाडे तसेच फूलझाडांची लागवड करण्यात आली.

पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार, 'सायबर'चे निवृत्त सहयोगी प्रा. डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. शिवाजी जाधव, शैलेश कोरे, यश हेगडे-पाटील यांच्यासह विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

1 1 AUG 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए.आय.ज्ञाननिर्मितीचे नव्हे माहितीचे साधन : डॉ.ज्ञानेश्वर गटकर



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) हे ज्ञान मिळवण्याचे किंवा ज्ञानाच्या निर्मितीचे साधन नसून ते केवळ माहिती देऊन आपल्याला मदत करणारे एक साधन आहे. संशोधक म्हणून ज्ञानाची नवनिर्मिती ही मानवी बुद्धीलाच करावी लागणार आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. ज्ञानेश्वर गटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'संशोधनामध्ये ए.आय.चा वापर' या विषयावरील विशेष कार्यशाळेत काल प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. गटकर म्हणाले की, ए.आय.कडे कितीही सृजनशीलता असली तरी ती विवेकी असेलच, असे नाही. ए.आय. स्वयंचलित वाटत असले तरी माणसाची बुद्धी त्याला जशी आज्ञा (प्रॉम्प्ट) देईल, त्यानुसारच ते कृती करते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करण्यापूर्वी आपण मानवी चुका आणि अज्ञानावर मात केली पाहिजे.

आपल्या सादरीकरणात डॉ. गटकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उगमापासून ते आजच्या आधुनिक युगातील संशोधनातील व कार्यालयीन वापरापर्यंतचा प्रवास उलगडला. 'ट्युरिंग टेस्ट' आणि अलान ट्युरिंग यांच्या संकल्पनेपासून सुरू झालेला ए.आय.चा प्रवास आज 'चॅट-जीपीटी', 'जेमिनी', 'क्लॉड' आणि विविध ए.आय. एजंट्सपर्यंत कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती दिली. शोधनिबंधांचे विश्लेषण, डेटा क्लीनिंग, संदर्भ शोधणे यासाठी आधुनिक टूल्सचा वापर कसा करावा, याविषयीही मार्गदर्शन केले.

डॉ. प्रकाश पवार अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. सध्याची पिढी टेक्नोसेव्ही आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी ए.आय. सारख्या तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. संशोधन योग्य दिशेला घेवून जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा विवेकी वापर होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी संशोधनात हे तंत्रज्ञान साह्य घेत असताना संशोधन पद्धतीची चौकट मोडता कामा नये.

डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला. कार्यशाळेला राज्यशास्त्र, समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

1 1 AUG 2026

तरुण भारत

# 'एआय म्हणजे ज्ञाननिर्मिती नव्हे तर माहितीचे साधन'

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) हे ज्ञान मिळवण्याचे किंवा ज्ञानाच्या निर्मितीचे साधन नसून ते केवळ माहिती देऊन आपल्याला मदत करणारे एक साधन आहे. संशोधक म्हणून ज्ञानाची नवनिर्मिती ही मानवी बुद्धीलाच करावी लागणार आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर गटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'संशोधनामध्ये एआयचा वापर" या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.



मार्गदर्शन करताना डॉ. गटकर

डॉ. पवार म्हणाले, तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. सध्याची पिढी टेक्नोसेव्ही आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी ए.आय. सारख्या तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. मात्र संशोधन पद्धतीची चौकट मोडता कामा नये. डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला. यावेळी राज्यशास्त्र, समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

1 1 AUG 2026

पुण्यनगरी

# 'एआय' ज्ञाननिर्मितीचे नव्हे, माहितीचे साधन : डॉ. गटकर

## विद्यापीठात 'संशोधनात एआय' बाबत कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे ज्ञान मिळवण्याचे किंवा ज्ञानाच्या निर्मितीचे साधन नसून ते केवळ माहिती देऊन आपल्याला मदत करणारे साधन आहे. संशोधक म्हणून ज्ञानाची नवनिर्मिती ही मानवी बुद्धीलाच करावी लागणार आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ. ज्ञानेश्वर गटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'संशोधनामध्ये ए.आय.चा वापर' विषयावरील कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. गटकर म्हणाले, 'ए.आय.'कडे कितीही सृजनशीलता असली तरी ती विवेकी असेलच, असे नाही. ए.आय. स्वयंचलित वाटत असले तरी माणसाची बुद्धी त्याला जशी आज्ञा (प्रॉम्प्ट) देईल, त्यानुसारच ते कृती करते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करण्यापूर्वी आपण मानवी चुका आणि अज्ञानावर मात केली पाहिजे, असेही ते म्हणाले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला.

11 AUG 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## एम.बी.ए. विभाग

## वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग

**(AICTE Approved and Recognized by DTE, Govt. of Maharashtra Inst. Code : 6002)**

Estd. 1962
"A++" *Accredited by* NAAC (2021) with CGPA 3.52

**एम.बी.ए. आणि बी.बी.ए. / एम. बी. ए. Integrated प्रवेश २०२६ - २०२७ : संस्थास्तरीय प्रवेश फेरी**

एम.बी.ए. विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मध्ये एम.बी.ए. आणि बी.बी.ए. /एम. बी. ए. **Integrated** अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर संभाव्य रिक्त जागांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

एम.बी.ए. शैक्षणिक अर्हता **MAH-MBA / MMS CET 2025 conducted by State Common Entrance Test Cell, Maharashtra State/CAT/ CMAT/ MAT / GMAT / ATMA** यापैकी कोणतीही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. (विद्यार्थ्यांनी विभागामध्ये अर्ज दि. ७ सप्टेंबर, २०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.)

बी.बी.ए./एम.बी.ए. **Integrated** शैक्षणिक अर्हता : **MAH-BCA/BBA/ BMS / BBM CET 2025 conducted by State Common Entrance Test Cell, Maharashtra State** प्रवेश परीक्षा उत्तीर्ण (विद्यार्थ्यांनी विभागामध्ये अर्ज दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.)

| | |
|---|---|
| गुणवत्ता यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. | 09/09/2026 up to 3.00 p.m. |
| स्पॉट राऊंड प्रवेश | 10/09/2026 at 10.30 am |

अधिकच्या माहितीसाठी विद्यार्थ्यांनी **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी. अथवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
०२३१ - २६०९३६४, २६०९३७५.

मा. कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दिनांक - ११/०८/२०२६